# उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांचे कार्यालय

मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड, पीन नं. 402201, फोन नं. 02141-222016, फॅक्स नं. 02141-222216

ईमेल - dycfalibag@mahaforest.gov.in


**तातडीचे**

विषयः- नेरळ-दस्तुरी रोड (एसएच-109) चे रुंदीकरण व मजबुतीकरणाबाबत प्रस्ताव. क्षेत्र 0.9850 हे.

जावक क्र. ब/20/जमिन/ 5955 /2016-17.
अलिबाग – 402 201, दिनांकः- 27/3/2017.

प्रति,

कार्यकारी अभियंता,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई.

संदर्भः- शासन निर्णय क्र. एफएलडी-1317/प्र.क्र.97/फ-10 दिनांक 27/03/2017.

नेरळ-दस्तुरी रोड (एसएच-109) चे रुंदीकरण व मजबुतीकरण करणेसाठी वनक्षेत्र 0.9850 हेक्टरचा प्रस्ताव कार्यान्वित आहे. सदर प्रस्तावास संदर्भीय महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग यांचे संदर्भीय पत्रान्वये तत्वतः मंजुरी काही अटी व शर्तींचे अधीन राहून प्रदान केली आहे. सोबत सदर पत्राची प्रत जोडली आहे.

तरी शासन निर्णयाप्रमाणेखालील प्रमाणे अटींची पूर्तता करणेत यावी.

<u>अट क्र. 1 -</u> वनक्षेत्राचा वैधानिक दर्जा बदलणार नाही.

<u>अट क्र. 2 –</u> वळते होणारे क्षेत्राचे मोबदल्यांत करावयाचे 1.00 हेक्टर अवनत क्षेत्रावर वनीकरण योजना राबविणेची आहे. पर्यायी वनीकरणासाठी स्थळनिहाय तयार करणेत आलेले अंदाजपत्रकाप्रमाणे रक्कम रु. 6,51,325/- (सहा लाख एकावन्न हजार तीनशे पंचविस) मात्र भरणा करण्यात यावी. **सदर रक्कम ई-चलन जनरेट करुन भरणा करणेत यावी.**

<u>अट क्र. 3 –</u> प्रकल्प प्रस्तावामध्ये ज्या कारणासाठी वनजमिन मागणी केलेली आहे त्या कारणाशिवाय इतर कारणासाठी वन जमिनीचा वापर करता येणार नाही.

<u>अट क्र. 4 –</u> सदर अटी नुसार नक्त वर्तमान मुल्य दर रक्कम रु. 7,30,000/- प्रति हेक्टर प्रमाणे वळतेकरण होणारे वनक्षेत्र 0.9850 हे. यासाठी रक्कम रु. 7,19,050/-(सात लाख एकोणीस हजार पन्नास) एवढी भरणा करावी लागेल. **सदर रक्कम ई-चलन जनरेट करुन भरणा करणेत यावी.**

<u>अट क्र. 5 –</u> सदर अटी नुसार केंद्रशासनाचे सुधारीत सुचनांनुसार सुधारीत दराने नक्त वर्तमान मुल्याची रक्कम भरण्यास तयार असलेबाबतचे हमीपत्र देण्यात यावे.

**<u>अट क्र. 6</u>** – या अटी नुसार सदर प्रकल्पासाठी लागू असलेले इतर अधिनियम, त्यातील तरतुदी तसेच मार्गदर्शक सुचनांचे काटेकोर पालन करण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची आहे.

**<u>अट क्र. 7</u>** - सदच्या अटीचे पालन करण्यास बांधील असल्याबाबत हमीपत्र पुर्तता अहवालासोबत सादर करण्यात यावे.

**<u>अट क्र. 8</u>** – विषयांकीत शासन निर्णयांत नमूद संदर्भीय केंद्रशासनाचे पत्रातील अटी व शर्तींचे पालन करणे प्रकल्प यंत्रणेवर बंधनकारक आहे.

**<u>अट क्र. 9</u>** – सदर प्रस्तावांत मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांचे परवानगीशिवाय प्रस्तावीत वन जमिनीवर कामास सुरुवात करण्यांत येऊ नये.

**<u>अट क्र. 10</u>** – प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना योग्य वाटतील अशा इतर अटींचे पालन करणे यंत्रणेवर बंधनकारक आहे.

उक्त अटींची पूर्तता केलेनंतर राज्य शासनाकडून अंतीम मंजूरी प्रदान करण्यात येईल व त्यानंतरच शासनाचे सुचनांप्रमाणे प्रत्यक्ष जमिन वर्ग करणेची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

वरील प्रमाणे पर्यायी वनीकरण योजना व नक्त वर्तमान मुल्याचे रकमेचा भरणा www.forestclearance.nic.in या संकेत स्थळावर लॉगईन करुन चलन जनरेट करुन भरणा करावा. भरणा केलेल्या चलनाची प्रत व अट निहाय पुर्तता अहवाल आवश्यक हमीपत्रांसह (Undertakings) **सहा प्रतीत** या कार्यालयास सादर करावा ही विनंती.

आपणाकडून सदर तत्वतः मंजूरी पत्रांतील अटीची पूर्तता केलेनंतर याबाबतचा पुर्तता अहवाल शासनास सादर करणे शक्य होईल.

Jayoti Banerjee

उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतिलिपीः- मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रतः- सहा. वनसंरक्षक, पनवेल यांचेकडे माहिती व जरुरी कार्यवाहीसाठी रवाना.

प्रतः- परिक्षेत्र वन अधिकारी, माथेरान व अलिबाग यांचेकडे माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.

-sd-.

उप वनसंरक्षक,
अलिबाग.